Add

२ वर्षांपेक्षा कमी शिक्षा असलेल्या शिफारसदारांची शिफारसपत्रे विचारात न घेण्याबाबत.

शिफारसदारांनी किती प्रकरणी शिफारस करावी याबाबत मर्यादा घालण्याविषयी.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण - १००२/प्र.क्र.१००/स्वासैक-१
मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
वाचा शा.स.नि.क्र.- पी.ओ.एस.१०९३/प्र.क्र.१२७/स्वा.सै.क.१,दि.४/७/९५
दिनांक - २२.८.२००२

**शासन निर्णय :-**

शा.नि.दि.४/७/९५ नुसार ज्या स्वातंत्र्य सैनिकांना २ वर्षाची शिक्षा झालेली आहे त्याची शिफारसपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रकरणी तपासणी करतांना असे आढळून आले आहे कीअपिलात गेल्यामुळे ज्या स्वातंत्र्य सैनिकांच्या शिक्षेचा कालावधी २ वर्षापेक्षा कमी झालेला आहे अशा स्वातंत्र्य सैनिकांनी एखाद्या अर्जदाराच्या प्रकरणी शिफारस केलेली असेलतर सदर शिफारस वैध धरावी किंवा कसे ? तसेच काही शिफारसदारांनी अनेक अर्जदारांच्या प्रकरणी शिफारशी सादर केलेल्या असल्याचे आढळून येत असल्यामुळे एखाद्या शिफारसदाराने किती अर्जदारांच्या प्रकरणी शिफारस करावी या बाबत ठोस निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १९ एप्रिल २००२ रोजी झालेल्या संपूर्ण उच्चाधिकार समितीच्या बैठकीत या संदर्भात सांगोपांग विचार करण्यात येऊन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, भारिगृत स्वातंत्र्य सैनिक सन्मान पेन्शन संदर्भात प्राप्त झालेल्या अर्जदाराच्या अर्जाची छाननी करताना ज्या स्वातंत्र्य सैनिकांच्या शिक्षेचा / कारावासाचा कालावधी अपिलात गेल्यामुळे २ वर्षापेक्षा कमी झालेला आहे अशा

झालेल्या मानधनाच्या अर्जाची छाननी करताना ज्या स्वातंत्र्य [illegible]

स्वातंत्र्य सैनिकांनी सादर केलेले शिफारसदारांचे शिफारसपत्र या पुढे वैध धरण्यात येऊ नये. तसेच एका शिफारसदाराने साधारणपणे जास्तीतजास्त ५० प्रकरणीच शिफारस करणे अपेक्षित असल्याने ज्या शिफारसदाराने यापेक्षा जास्त प्रकरणात शिफारस केलेली आढळून आल्यास अशी शिफारसपत्रे विचारात घेण्यात येऊ नयेत. या आदेशाची अंमलबजावणी शासन निर्णयाच्या दिनांकापासून करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.रा.घडेकर)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
अध्यक्ष,स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
सभापती,स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,मंत्रालय,मुंबई,
सदस्य सचिव,स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,मंत्रालय,मुंबई,
स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सर्व सदस्य (पत्राने),
प्रधान सचिव (वि.चौ.अ.-२) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई,
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येते की, पेन्शन मंजूर होणा-या प्रकरणात थकबाकीची रक्कम अदा करण्यापूर्वी शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराकडून शपथपत्र स्वरुपातील संमति पत्र घेण्यात येऊन शासनास सादर करण्यात यावे.
महालेखापाल,महाराष्ट्र राज्य-१,मुंबई,
महालेखापाल,महाराष्ट्र राज्य-२,नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय (योग्य ते प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी)